प्रति
संपादक/वृत्तसंपादक
कृपया, प्रसिध्दी करिता सादर

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९५

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२, मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक. ०५

दिनांक : ०९.०७.२०१९

## बेस्ट उपक्रमाच्या बससेवेच्या प्रवासभाडयाचे सुसूत्रिकरण

मुंबई,०९- बेस्ट उपक्रमाच्या प्रवासभाडयाचे सुसूत्रिकरण **दि. ०९.०७.२०१९ पासून** करण्यात येत आहे.

**प्रवासभाडे सुसूत्रिकरणाची वैशिष्टये -**

१. **विना वातानुकूलित बससेवा** - जास्तीत जास्त प्रवाशांना उपक्रमाच्या बससेवेचा लाभ घेता यावा, याकरीता कमीत कमी प्रवासभाडे **रु.८/- वरुन रु.५/-** करण्यात आलेले आहे. तसेच **जास्तीत जास्त प्रवासभाडे रू.२०/-** निश्चित करण्यात आले आहे.

२. **वातानुकूलित बससेवा** - वातानुकूलीत बससेवांवर देखील कमीत कमी प्रवासभाडे **रु.२०/- वरुन रु.६/-** करण्यात आलेले आहे. तसेच **जास्तीत जास्त प्रवासभाडे रू.२५/-** निश्चित करण्यात आले आहे.

### नवीन प्रवासभाडेसारणी

| कि.मी. | विना-वातानुकूलित (रु) | वातानुकूलित (रु) |
|---|---|---|
| | | |
| ० ते ५ | ५ | ६ |
| ५.१ ते १० | १० | १३ |
| १०.१ ते १५ | १५ | १९ |
| १५ कि.मी.पेक्षा अधिक | २० | २५ |

...२...

३. **दैनंदिन बसपास** – या दैनंदिन बसपासच्या सहाय्याने प्रवासी मुंबई शहर, उपनगरे तसेच बेस्ट उपक्रमाचे बसप्रवर्तन कार्यरत असलेल्या **संपूर्ण प्रवर्तन क्षेत्रामध्ये अमर्याद प्रवास** करू शकतील. दैनंदिन बसपासचे शुल्क **रु.९०/– वरून रू.५०/–** करण्यात आलेले आहे. तसेच वातानुकूलीत बससेवांवरील बसपास **रू.२००/– वरून रू.६०/–** करण्यात आलेला आहे.

| सेवेचा प्रकार | बसपास दर (रुपये) |
|---|---|
| **विनावातानुकूलित** | ५० |
| **वातानुकूलित** | ६० |

४. **शालेय विद्यार्थ्यांकरीता असलेली सवलतीच्या बसपासची सुविधा कायम ठेवण्यात आलेली आहे.**

| **बसपास** | **मासिक (रु)** | **त्रैमासिक (रु)** | **सहामाही (रु)** |
|---|---|---|---|
| इयत्ता ५ वी पर्यत | २०० | ६०० | १००० |
| इयत्ता ६ वी ते १० वी पर्यत | २५० | ७५० | १२५० |
| इयत्ता ११ वी, १२ वी ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी व पदविका अभ्यासक्रम | ३५० | १०५० | १७५० |

५. **ठराविक अंतराचे बसपास** – या बसपासच्या सहाय्याने प्रवासी त्यांनी निश्चित केलेल्या अंतरादरम्यान अमर्याद प्रवास करू शकतात.

| **अंतर (कि.मी.)** | **विनावातानुकूलित सेवा (रुपये)** | | | **वातानुकूलित सेवा (रुपये)** | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **प्रवासभाडे** | **मासिक** | **त्रैमासिक** | **प्रवासभाडे** | **मासिक** | **त्रैमासिक** |
| ५ | ५ | २५० | ७५० | ६ | ३०० | ९०० |
| १० | १० | ५०० | १५०० | १३ | ६५० | १९५० |
| १५ | १५ | ७५० | २२५० | १९ | ९५० | २८५० |
| **- संपूर्ण बसप्रवर्तन क्षेत्राकरीता –** | | | | | | |
| **१५ कि.मी.पेक्षा अधिक प्रवासाकरीता** | | **१०००** | **३०००** | | **१२५०** | **३७५०** |

६. **ग्लोबल बसपास – १५ कि.मी.पेक्षा अधिक प्रवासाकरीता बसपास रू.१०००/–** मुल्यवर्गाचा बसपास उपलब्ध करण्यात आलेला आहे. या बसपासच्या सहाय्याने प्रवासी मुंबई शहर, उपनगरे तसेच बेस्ट उपक्रमाचे बसप्रवर्तन कार्यरत असलेल्या **संपूर्ण प्रवर्तन क्षेत्रामध्ये अमर्याद प्रवास** करू शकतील. जास्तीत जास्त अंतराकरीताच्या मासिक बसपासचे शुल्क **रु.१९८०/–वरून रू.१०००/–** करण्यात आलेले आहे. तसेच **वातानुकूलीत** बससेवांवरील बसपास **रू.४४००/– वरून रू.१२५०/–** करण्यात आलेला आहे.

७. **दिव्यांग प्रवासी – मोफत प्रवास** – बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर्थिक सहकार्याने ४०% व त्यापेक्षा अधिक अपंगत्व असलेल्या आणि बेस्ट उपक्रमाने दिलेले RF-ID स्मार्टकार्ड ओळखपत्र धारण करणा-या दिव्यांग प्रवाशांना उपक्रमाच्या बसगाडयांमधून मोफत प्रवासाची सुविधा देण्यात येते. या योजनेमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

८. **महापालिका शाळेतील गणवेषधारक विद्यार्थी – मोफत प्रवास** – बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर्थिक सहकार्याने महापालिका शाळेतील गणवेषधारक विद्यार्थ्यांना निवासस्थान ते विद्यालय दरम्यान उपक्रमाच्या बसगाडयांमधून मोफत प्रवासाची सुविधा देण्यात येते. या योजनेमध्ये देखील कोणताही बदल करण्यात आलेला नाही. या योजनेचा लाभ घेण्याकरीता देखील बेस्ट उपक्रमाचे RF-ID स्मार्टकार्ड ओळखपत्र घेणे आवश्यक राहील.

९. **पथकर नाक्यांवरुन प्रवास करणा-या प्रवाशांचे अतिरिक्त प्रवासभाडे रद्द** - विद्यमान प्रवासभाडेसारणीनुसार पथकर नाक्यांवरुन प्रवास करणा-या प्रवाशांकडून रु.१/- अतिरिक्त प्रवासभाडे आकारण्यात येत होते. नवीन प्रवासभाडेसारणीमध्ये हे अतिरिक्त प्रवासभाडे रद्द करण्यात आलेले असून सर्व प्रवाशांना सारख्याच पध्दतीने प्रवासभाडे आकारण्यात येईल.

१०. **ज्येष्ठ नागरीकांना मासिक व त्रैमासिक बसपासमध्ये विद्यमान पध्दतीप्रमाणे अनुक्रमे रु.५०/- व रु.२००/- अशी सवलत कायम ठेवण्यात आलेली आहे.**

११. **प्रौढ – बालक एकसमान प्रवासभाडे** – प्रवासभाडयात करण्यात आलेली कपात विचारात घेऊन प्रौढ व बालक प्रवासभाडे एकसमान ठेवण्यात आलेले आहे.

निवासस्थान आणि रेल्वे स्थानके यांना जोडणा-या बससेवांप्रमाणेच लांब पल्ल्याच्या बसमार्गांवरील प्रवासभाडे देखील कमी करण्यात आलेले आहे. **कमीत कमी प्रवासभाडे रु.५/- व जास्तीत जास्त प्रवासभाडे रू.२०/-** या सुविधेचा सर्व प्रवाशांनी लाभ घ्यावा.

-------------()-----------